जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२७/०५/२०२३
## दि.२६/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो.स्टे.५३६/२०२३,भादविक ३०७,४९८अ,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला, वर्ष २५ रा.कोंढवा पुणे |
| **आरोपीत** | पती,सासु,सासरे,नणंद (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १६/०९/२०२१ ते दिनांक २५/०५/२३ रोजी २३.३० पर्यंत कामठे बिल्डींग फ्लॅट नं डी १० येवलेवाडी कोंढवा बु पुणे व रा.मु.पो.नामपुर ता.सटणा नाशिक येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील वरील नमुद इसमांनी वेळोवेळी लग्नात मानपान व सोने दिले नाही ते तुझ्या आई वडीलांकडुन घेवुन ये नाहीतर आमचे घरी राहु नको असे बोलुन फिर्यादी यांचा शारिरीक व मानसिक छळ करुन पती यांने चारीत्र्यावर संशय घेवुन वाद करुन फिर्यादी यांना पेट्रोल टाकुन मारुन टाकील अशी धमकी देवुन बाटली मधील पेट्रोल टाकुन पेटवण्याचा प्रयत्न केला आहे.व छोटया मुलाचे गळयावर पाय ठेवुन मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.बाबर मो.नं.९९६७९११०३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो.स्टे.१७२/२०२३,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय २१ वर्षे,रा.कोंढवा पुणे |
| **आरोपीत** | मोटारस सायकलवरील एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०५/२०२३ रोजी दुपारी १६/३० वा.चे सुमारास टिंबर मार्केट भवानीपेठ पुणे येथे घडला असे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,नमुद इसमानी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातामधील ३२,०००/- रू किमतीचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.राकेश जाधव,मो.नं.८८०५२९२०८८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो.स्टे.४१०/२०२३,भादविक ३०४(अ),२७९,३३७,३३८,४२७,मो.वा.का.कलम १८४,१३४(१)(२)/१७७ |
| **फिर्यादी** | प्रवीण धोत्रे वय २५ वर्ष रा.कोरेगाव पार्क पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात कार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/५/२०२३ रोजी दुपारी १५/३० वाजताचे सुमारास ट्री कास्ट इंडिया इन्फ्रास्ट कचर कंपनी कॉर्नर जवळ वाडेबोलाई तालुका हवेली जिल्हा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी रिक्षास जोरात समोरून धडक देऊन रिक्षांचे पूर्णपणे नुकसान करुन फिर्यादी सह दोघांना गंभीर जखमी करुन फिर्यादी यांचा चुलत भाऊ आकाश पांडुरंग धोत्रे वय २७ वर्षे रा.कोरेगाव पार्क लेन नं.५ कोलते पाटील बिल्डींग पुणे यांस गंभीर जखमी करुन त्यांचे मृत्यूस कारणीभूत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी जाधव मो.नं..८१०८९६६००९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो.स्टे.२४५/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २१ वर्षे, रा.सय्यदनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०५/२०२३ रोजी पहाटे ०४/०० वा.चे सुमारास ९३ अॅव्हेन्यू मॉल,पुणे सोलापूर रोड,वानवडी,पुणे येथील बी.टी.कवडे रोडचे लगत असलेल्या चहाच्या टपरीचे शेजारील मोकळया जागेत |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे दोन मित्र असे चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी थांबले असता तेथे उभा असलेल्या एका इसमाने जाणीवपुर्वक फिर्यादीस धक्का मारून फिर्यादीस खेचून त्याचेसोबत टपरी शेजारील हम रस्त्यालगतचे मोकळया जागेत घेवून जावून तेथे त्या इसमाचे उभे असलेले साथीदारापैकी एकाने त्याचेकडील धारदार हत्यार काढून फिर्यादीचे मानेवर ठेवून फिर्यादीचे पॅन्टच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने काढून घेवून धमकी देऊन फिर्यादीचे पॅन्टचे खिशातून जबरदस्तीने पैसे काढून घेतले. तसेच फिर्यादीचे मित्र फिर्यादीस पाहण्यासाठी आले असता तेथे असलेल्या आणखी दोन इसमांनी त्यांना हाताने मारहाण करून त्याचेकडील असलेले पैसे असे रोख १,६००/- रुपये व मोबाईल असा एकूण १९,६००/- रुपये किंमतीचा माल जबरदस्तीने काढून चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.संतोष सोनवणे,मो.नं.८८८८१८६९९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृगी पो.स्टे.३४६/२०२३,भादविक ४१९,४२० व माहीती तंत्रज्ञान अधि.कलम ६६सी,६६ डी. |
| **फिर्यादी** | एक महिला वय २६ वर्षे,रा.बालेवाडी गाव,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल व बँक अंकाऊंट धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे मोबाईल वर वरील नमुद मोबाईल धारक यांनी फोन करून मला आपण एक पार्सल पाठविले आहे,आपण जर नसेल पाठविले तर पोलीसांना कळवा असे सांगुन सदर फोन कॉल पोलीस डीपार्टमेंटला ट्रान्सफर केला.व समोरील व्यक्तीने तो पोलीस बोलत असल्याचे सांगुन फिर्यादी यांना स्काईप अॅप्लीकेशन डाऊनलोड करायला सांगितले.त्याचे सांगणेप्रमाणे फिर्यादी यांनी स्काईप अॅप्लीकेशन डाऊनलोड केलेनंतर समोरील व्यक्तीने स्काईपवर कॉल करून आधारकार्ड मागीतले व चार क्रिमीनल लोक आधार कार्डचा मिसयुज करीत असले बाबत सांगितले.त्यानंतर त्यांनी अकाऊंटची चौकशी करायची आहे.असे सांगुन अकाऊंट वर किती पैसे आहेत.याबाबत विचारणा करुन आरबीआय चे अंकाऊंटवर सर्व पैसे ट्रान्सफर करावे लागतील ते सदर पैसे तुम्हाला तपास झाले नंतर पुन्हा परत मिळणार आहेत.असे सांगितले.समोरची व्यक्ती पोलीस आहे.असे समजुन घाबरून फिर्यादी यांनी मोबाईल अॅप वरून आयसीआयसीआय बँक खात्यावर ६,९९,५२९.४० रूपये ट्रान्सफर केले.त्यानंतर साधारण एक तासाने सदर स्काईप अॅपवर फिर्यादी यांनी केस बाबत विचारणा केली असता त्याबाबत कोणतेही प्रतिक्रिया आली नाही.त्यानंतर फिर्यादी यांची खात्री झाली की,त्यांची ऑनलाईन फसवणूक झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अंकुश चिंतामण मो.नं.९०४९२७७९६६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो.स्टे.३२७/२०२३,भादविक २७९,३०४ (अ) मो.वा.का.कायदा कलम ११९/१७७ |
| **फिर्यादी** | सचिन तात्याराव पवार पोलीस शिपाई भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | संभाजी कुंभार वय ३४ वर्षे,रा.सांगली (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २६/०५/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा.चे सुमारास हॉलीडे इन हॉटेल चे समोर,पुणे सातारा रोड, कात्रज घाट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील शिवशाही बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार रोहीत मारूती वीर वय २२ वर्षे, रा.निनाई मंदीराजवळ,तुळसण ता.कराड जि.सातारा यांचे मोटार सायकला धडक देवून तो खाली पडून बसचे पाठीमागील चाकाखाली आल्याने त्याचे डोक्यास हातास गंभीर दुखापत होवून त्याचे मृत्यूस कारणीभूत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.मोहन देशमुख मो.नं.९७६५३९०९४३ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृगी पो.स्टे.३४७/२०२३,भादविक ४१९,४२०,४६५,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | विनायक सोपान दडसपाटील, पोलीस उपनिरीक्षक,भिगवण पोलीस ठाणे पुणे शहर |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | सचिन भिमराव वाघमोडे रा.मु.पो.लक्ष्मीटाकळी, ता.पंढरपुर जि.सोलापुर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०५/२०२३ रोजी ते आज पावेतो पोलीस अधिक्षक कार्यालय,पुणे ग्रामीण,पाषाण पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी वर नमूद ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद इसम याने पोलीस शिपाई भरती प्रक्रिये दरम्यान पुणे ग्रामीण घटकात पोलीस शिपाई या पदावर भरती होणे करीता जाणीव पुर्वक शासनाची फसवणुक करुन ठकवणुक करण्याच्या हेतुने बनावट सुशिक्षीत बेरोजगार अंशकालीन (पीटीई) बनावट प्रमाणपत्र खोटे किंवा बोगस तयार करुन पोलीस दलात भरती होण्यासाठी सदरचे बेरोजगार अंशकालीन प्रमाणपत्र बनावट आहे.याची माहिती असताना सुद्ध पोलीस भरती दरम्यान पोलीस अधिक्षक कार्यालय,पुणे ग्रामीण येथे सादर केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सचिन गाडेकर,मो.नं.९५५२३१५३१५ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो.स्टे.४११/२०२३,भादविक ३०४(अ),२७९,३३८,४२७,मो वा का कलम १८४,१३४,११९,१७७ |
| **फिर्यादी** | चंदन गोंड वय ३५ वर्ष रा.मांजरी खुर्द ता.हवेली जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात ट्रक चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/०५/२०२३ रोजी दुपारी १५/०० वा.चे सुमारास मौजे केसनंद ता.हवेली जि.पुणे गावचे हद्दीत जोगेश्वरी मंदिराचे समोर वळणावर लोणीकंद ते केसनंद रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा पुतण्या विशाल ऋषिमुनी गोंड वय २३ वर्ष रा. डोमखेल वस्ती वाघोली ता.हवेली जि.पुणे हा मोटार सायकलवरुन जात असताना त्यास धडक देऊन मोटार सायकलचे नुकसान करुन त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा माने मो.नं.९९२११७६२३७ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो.स्टे.८४/२०२३,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४२ वर्षे रा.बिबवेवाडी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/०५/२०२३ रोजी सकाळी ०५/४५ वा.चे दरम्यान पुणे मनपा ब्रिज बस स्टॉप ते जिजामाता चौक या दरम्याने शिवाजी रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणा हुन रिक्षा मधुन प्रवास करीत असतांना रिक्षामध्ये बसलेले रिक्षाचालक व त्याचे अन्य साथीदार यांनी फिर्यादी यांचे बॅगमध्ये ठेवलेले २,८८,०००/-रु.किंमतीचे सोन्याचे दागिने नजर चुकवुन फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे उद्देशाने चोरुन नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.आर.एन.पवार मो.नं.८१०८८५९४४४ |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो.स्टे.२४४/२०२३,भादविक ३०४(अ),२७९, मो.वा.कायदा कलम ११९/१७७,१८४ |
| **फिर्यादी** | प्रशांत सिताराम ठाकरे पोलीस हवालदार नेमणुक वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | बाबु अनंतय्या मंगल वय ४६ वर्षे रा.लोहिया नगर,गंज पेठ पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/०५/२०२३ रोजी दुपारी १४/३० ते १५/३० वा.चे दरम्यान लुल्लागनर चौक ते गोळीबार मैदान चौकाकडे जाणाऱ्या दुतर्फी रोडवर सी.डी.सी.न्यु कमांड हॉस्पिटल जवळ वानवडी पुणे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील नमुद मयत इसम बाबु अनंतय्या मंगल वय ४६ वर्षे रा.लोहिया नगर,गंज पेठ पुणे यांने त्याचे ताब्यातील ॲक्टिव्हा मोपेड ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी स्वतः रोडचे कडेला असलेल्या दगडी कट्टयाला धडकुन पडुन गंभिर जखमी होवुन स्वतःच्या मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.संतोष गायकवाड मो.नं.८३०८९३२१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**